नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 24/01/2024 (बुधवार) दुपार

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीस अटक
## वाहनासह एकुण २०,३०,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त
## पोलीस स्टेशन भिवापूरची कारवाई

दिनांक २४/०१/२०२४ रोजी सकाळी ०८.०० वा. दरम्यान पो. स्टे. भिवापूर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग व वाहतूक केसेस करीत असताना भिवापूर कडून नक्षी फाट्याकडे १० चक्का टिप्पर क्र. MH-40/AK-5919 हा येतांना दिसला त्याचा पाठलाग करून नक्षी फाटा येथे थांबवून पाहणी केली असता त्यामध्ये अंदाजे ०६ ब्रास रेती मिळून आल्याने सदर ट्रक चालकास ट्रक मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता त्याने रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने टिप्पर क्र. MH-40/AK-5919 किंमती २०,००,०००/—रू. व त्यामध्ये ०६ ब्रास रेती किंमती ३०,०००/—रू. असा एकूण २०,३०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करून सदर टिप्पर क्र. MH-40/AK-5919 चा चालक **आरोपी नामे— १) पवन पुरूषोत्तम नान्हे, वय २४ वर्ष, रा. नेरला पवनी भंडारा २) मालक नामे— दुधराम बावनकर, रा. येनोडा ता. पवनी** यांचेविरुद्ध कलम ३७९, १०९ भा.द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. भिवापूर येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपी चालक यास अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदिप पखाले, उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक प्रमोद चौधरी, पोलीस उपनिरीक्षक सडमेक, सहायक फौजदार ठाकूर, पोलीस हवालदार किशोरसिंग ठाकूर राकेश त्रिपाठी, पोलीस अंमलदार रवी वानखेडे, चालक पोलीस हवालदार सोरते यांनी केली.




## कन्हान येथील सराईत गुन्हेगार निखील उर्फ सन्नी अनिल गजभिये याला MPDA कायदयांतर्गत ०१ वर्षाकरीता केले स्थानबध्द

पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत येणाऱ्या अशोक नगर, ता. पारशिवनी, पोस्टे कन्हान परीसरात राहणारा सराईत गुन्हेगार निखील उर्फ सन्नी अनिल गजभिये, वय २५ वर्ष हा मागील ०६ वर्षापासून कन्हान परिसरात गुंडगिरी करुन दरोडा, खुनाचा प्रयत्न, गंभीर दुखापत, विनयभंग, जुगार तसेच अवैध प्राणघातक शस्त्र बाळगुन शरीराविरूद्ध व मालमत्तेविरूद्ध गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. त्याच्या असामाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या लोकांमध्ये तो भय निर्माण करुन दहशत पसरवित असतो. नागपूर ग्रामीण पोलीसांना त्याचेविरुध्द जेव्हा जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या त्या त्या वेळी गंभीर दखल घेवून त्याचेविरुध्द गुन्हे नोंद केले व त्याला अटक केले होते. परंतु निखील उर्फ सन्नी याचे गुन्हेगारी प्रवृत्तीमध्ये सुधारणा झाली नाही. त्याचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली होती. परंतु निखील उर्फ सन्नी याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरुच ठेवली. निखील उर्फ सन्नी याचे कृत्य सामाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागेपूर ग्रामीण कडुन MPDA कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांनी दि. २३/०१/२०२४ रोजी सराईत गुन्हेगार निखील उर्फ सन्नी अनिल गजभिये याचे विरुध्द स्थानबध्दता आदेश काढुन त्यास ०१ वर्षाकरीता स्थानबध्द केले.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री हर्ष ए. पोद्दार व अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, पोलीस स्टेशन कन्हान येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक सार्थक नेहेते तसेच स्थानिक गुन्हे शाखेतील सहायक पोलीस निरीक्षक

आशिषसिंग ठाकुर, सहायक फौजदार सुरज परमार, पोलीस हवालदार निलेश बर्वे, पोलीस अंमलदार होमेश्वर वाईलकर यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**